CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly - Nov. 2018-Apr. 2019
Issue X Vol III, Feb. 2019

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# Current Global Reviewer

**UGC Approved International Research Refereed Multidiciplanary Journal**

**Editor In Chief**
**Mr. Arun B. Godam**

ISSUE X Volume III ( Half Yearly) Nov. 2018 To Apr. . 2019

**Published on Feb. 2019**

**Editorial Office Address :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur,
Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999
Email-
hitechresearch11@gmail.com

Publisher
**Shaury Publication**
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

**Rs. 400/-**

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Chitta Ranjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous College, Cuttack – (Orissa)

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Pravin Diddeshwar Shete**
Dept. of Zoology, Maharashtra
Udaygiri Mahavidyalaya, Udgir,
Dist. Latur

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad. Dist. Aurangabad

**Dr U.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. Hanumant Mane**
R.Guide & Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. Sachin Kadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm. &
B.N. Sarda Sci. College, Sangmner,
Dist. Ahmadnagar (M.S.)

***www.rjournals.co.in***

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Innovative Teaching Methods And Their Significance | *Dr. Balid Ujwala Shimon* | 1 |
| 2 | Language Barrier: an Impact of Cultural Difference reflected in *The Italians* by F. G. Paci | Jayashri M. Lohar | 5 |
| 3 | Comparative Politics | Mrs Maimanat Jahan Ara | 10 |
| 4 | Demonetization and Electronic Payment System | Prof . Durdana Siddiqui | 16 |
| 5 | Digital payment system: Financial Literacy | Memon Sohel Mohd Yusuf | 23 |
| 6 | Impact of Digital Payment System and Social Life | Siddharth Nisargandha | 29 |
| 7 | Choline chloride $2SnCl_2$ ionic liquid: an efficient and reusable catalyst for the solvent free modified Kabachnik–Fields reaction for α-aminophosphonate. | Tidke Vishwamber Angadrao | 37 |
| 8 | Issues In Rural Community Development Shambhu Dutt | Sharad Suryakant Pawar | 42 |
| 9 | *In Vitro* Antagonistic Activity of *Trichoderma* species against *Macrophomina phaseolina* (Tassi) Goid | Dr. Aithal Sadanand V. | 45 |
| 10 | महाराणा प्रताप : एक मातृभक्त स्वाभिमानी योध्दा | देशमुख गंगाधर बालाजीराव | 50 |
| 11 | भाषांतर-अनुवाद प्रक्रियचे स्वरूप | प्रा.डॉ. संतोष चंपती हंकारे | 55 |
| 12 | छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान | डॉ. श्रीहरी दासु चव्हाण | 58 |
| 13 | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : एक अभ्यास | प्रा. बदनाळे एस. एस. | 61 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील आदर्श समाज आणि वास्तवता | दिपाली चंद्रकांत पांडे | 65 |
| 15 | " बुद्धतत्त्वज्ञानाची मुख्य आधारतत्त्वे व नैतिक शिकवण " | डॉ. बालाजी मा. गव्हाळे | 68 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly - Nov. 2018-Apr. 2019 | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol III , Feb. 2019 | Impact Factor : 2.143

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : एक अभ्यास

**प्रा. बदनाळे एस. एस.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

---------------- (13) ----------------

**प्रस्तावना :-**

भारत देश हा खेड्यांचा देश म्हणून परिचित आहे. त्यामुळे ग्रामीण भागाला केंद्रबिंदु समजून 73 व्या घटनादुरुस्तीने पंचायत राजव्यवस्थेला मोठी बळकटी मिळालेली दिसून येते. ग्रामीण भागामध्ये अस्वच्छतेचे प्रमाण बहुतांश असल्यामुळे तेथे आरोग्याचे अनेक प्रश्न सातत्याने निर्माण होत आहेत. म्हणून मानवी जीवन आणि स्वच्छता यासंबंधी ग्रामीण जनतेमध्ये जाणीव निर्माण व्हावी म्हणून शासनाच्या वतीने विविध उपक्रम, कार्यक्रम सातत्याने राबविण्यात येतात. मानवी जीवनात स्वच्छतेला फार महत्त्व आहे. म्हणून ग्रामीण स्वच्छतेमागचा मुळ उद्देश ग्रामीण भागातील सामान्य मानसाचे आरोग्यमान उंचावणे हा आहे. अशुद्ध पाणी, अस्वच्छ परिसर, सामाजिक व वैयक्तिक स्वच्छते अभावी उद्भावणाऱ्या रोगांमुळे पिडीत असणाऱ्यांची आकडेवारी वाढल्याने स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटावे व स्वच्छतेच्या कार्यात लोकांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवात सन 2000-2001 पासून करण्यात आली आहे. ग्रामस्वच्छतेची चळवळ ही आज लोक चळवळ बनली आहे. या कार्यक्रमाचे घोषवाक्य स्वच्छतेकडून समृद्धकडे असे आहे. आरोग्य संपत्ती ही श्रेष्ठ संपत्ती आहे. उत्तम शरीरातच उत्तम मन असते या उपयुक्तीपासून प्रेरणा घेऊन ग्रामस्वच्छता अभियान सातत्याने जनजागृत्ती करीत असते. म्हणून सदरील शोधनिबंधात मानवी जीवनात स्वच्छतेचे महत्त्व या संदर्भातील मौलिक बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**उद्दीष्टे -**

1) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान स्थापन करण्यामागची पार्श्वभूमि तपासणे.
2) ग्रामस्वच्छता अभियानाच्या कार्याचा अभ्यास करणे.
3) स्वच्छतेकडून समृद्धीकडे ही संकल्पना मूर्त स्वरुप घेत आहे की नाही ? हे तपासणे.
4) ग्रामीण विकासात लोकसहभाग वाढल्याने स्वालंबनाचा मार्ग कितपत सुकर झाला आहे ते पाहणे.

**गृहितके -**

1) संत गाडगेबाबा यांनी ग्रामस्वच्छतेला जीवनाचा अविभाज्य भाग मानले होते.
2) खरा भारत हा खेड्यात वसलेला आहे. त्यामुळे खेडी समृद्ध झाली पाहिजे यावर भर दिला आहे.
3) ग्रामस्वच्छतेची चळवळ ही आज लोकचळवळ बनली आहे.

**संशोधन पद्धती -**

द्वितीय संकलन प्रस्तुत अध्ययनासाठी संशोधन साधनाचा, द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, संशोधन पत्रिका इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे उद्देश :**

महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतीचे क्षेत्र उघड्यावरील शौचविधीपासून मुक्त किंवा हगणदारी मुक्त करण्यासाठी शासनाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची सुरुवात केली. या अभियानाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

1) राज्यातील ग्रामीण भाग हगणदारीमुक्त करणे.
2) ग्रामीण नागरिकांचे आरोग्यमान व जीवनमान उंचावणे.

3) वैयक्तिक शौचालय बांधकाम व वापरास चालना देणे.

4) आरोग्यदृष्ट्या शौचालयाच्या महत्त्वाविषयी जनजागृत्ती करणे.

5) ग्रामीण समाजाला स्वच्छतेतून समृद्धीकडे घेऊन जाणे.

6) महिलांची कुचंबना थांबविणे, त्यांच्या मान-सन्मानात भर घालणे.

7) अंगणवाडी व शाळेतील मुला-मुलींच्या गैरहजेरीचे प्रमाण कमी करण्यासाठी अंगणवाडी व शाळेत स्वच्छता सुविधा निर्माण करणे.

8) पिण्याच्या पाण्याचे व सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे.

9) राज्यात ग्रामस्वच्छतेच्या दृष्टीने स्पर्धेचे वातावरण निर्माण करणे.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे नियम :**

1) राज्यातील सर्व ग्रामपंचायतीना या अभियानात सहभागी होणे अनिवार्य राहिल.

2) राष्ट्र संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामपंचायत स्पर्धेतील सर्व स्तरावरील एका बक्षिसासाठी शक्य तो एकाच ग्रामपंचायतीची निवड करावी.

3) तपासणी समितीच्या प्रत्येक सदस्याने आपल्या वरील जबाबदारीची जाणीव ठेवून ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची तपासणी व मूल्यांकन निपक्षपातीपणाने करावे.

**प्रशासकीय संघटन :**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानासाठी व त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी ग्रमास्तरावर व जिल्हा स्तरावर ग्रामस्वच्छता अभियान समितीचे गठन करण्यात येते.

अ) ग्रामस्तरावरील ग्रामस्वच्छता अभियान समिती ब) जिल्हास्तरावरील ग्रामस्वच्छता समिती

**सहभाग व वेळापत्रक :**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात राज्यातील सर्व ग्रामपंचायती सहभागी होवू शकतात. त्यासाठी ग्रामपंचायती 2 ऑक्टोबर ते 26 जानेवारी या कालावधीत या अभियानात भाग घेत असल्याबाबतचे पत्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर करावे लागते. अभियानाची सुरुवात 1 ऑक्टोबर रोजी महिला ग्रामसभा व 2 ऑक्टोबर रोजी ग्रामसभा घेवून होते. ते 31 डिसेंबर पर्यंत म्हणजेच जवळजवळ 3 महिने चालते. अभियानातील ग्रमापंचायतींची तपासणी करुन अ,ब,क अशी प्रतवारी करण्यात येते व फक्त अ वर्ग असणाऱ्या ग्रामपंचायतींचाच पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो.

**1) गाव हगणदारी मुक्त करणे :**

या अभियानाच्या माध्यमातून लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी शौचालय बांधकाम व वारातबाबत जागृत्ती निर्माण करुन शौचालयाचे महत्त्व पटवून दिले जाते. उघड्यावरील शौचविधी व अस्वच्छ पाण्यामुळे होणाऱ्या रोगांविषयी माहिती दिली जाते. शौचालय बांधकाम व वापरास लोकांना प्रवृत्त करणे व गावाला हगणदारीमुक्त बनविणे हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे.

**2) सांडपाणी व्यवस्थापन :**

पाण्याच्या वापरानंतर जे पाणी अशुद्ध होऊन पुन्हा वापरास लायक नसते, आज सांडपाणी हे मानवी वापरातून तयार हाते. मलमूत्रासाठी वापरण्यात येवून तयार होणारे पाणी, स्नान व स्वयंपाक घरातून तयार होणारे पाणी, कपडे, भांडी धुवून तयार होणारे पाणी असे सांडपाणी तायार होते. शुद्ध पाण्यावर मानवाचे आरोग्य अवलंबून असते. सर्वसाधारणपणे गडुळ, साठलेले, जंतु मिश्रित नदीच्या पात्रातील, विहिरीत साचलेले पाणी, पाण्याच्या सभोवताली वाहत जाणारी सांडपाण्याची गटारे, फुटलेली ड्रेनेज यासारख्या अवस्थेतील पाणी प्याल्याने त्याचा नक्कीच आरोग्यावर वाईट परिणाम होतो. सांडपाण्याच्या व्यवस्थेअभावी

घाणीचे साम्राज्य निर्माण होते. त्यातुन डास उत्पत्ती व त्याद्वारे मानवी वस्तीत अनेक प्रकारचे रोग पसरविण्यास कारणीभूत ठरते. ग्रामीण भागातील ही परिस्थिती सुधारण्याचे कार्य ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून केले जात आहे.

**3) पिण्याचे पाणी व्यवस्थापन :**

प्रत्येक गावांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी पंचायतराजची आहे. शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यामुळे ग्रामीण जनतेचे आरोग्य रक्षण होते. पाणी दुषित झाले तर काळ ठरु शकते. अशुद्ध पाण्यामुळे अनेक आजार होतात व त्यातून मृत्यू सुद्धा संभवतो. स्वच्छ दिसणाऱ्या पाण्यात मानवास हानीकारक ठरु शकणारे कोट्यावधी रोगजंतू असतात. साथीच्या रोगापैकी 80% रोग ह दुषित पाण्यामुळे होतात. त्यात 0 ते 5 वर्षे वयोगटातील होणाऱ्या बालमृत्यूपैकी 25% मृत्यूचे कारण जलजन्य आजार हे आहे. दुषित पाण्यामुळे पोलिओ, कावीळ, विषमज्वर, कॉलरा, गॅस्ट्रो,इ. रोग होतात. या सर्व बाबींची वेळीच काळजी घेण्याचे कार्य या अभियानांतर्गत केले जाते.

**4) कचरा व्यवस्थापन :**

बहुतेक खेड्यातील नागरिक घरातील कचरा कडेकोपऱ्यात लावतात. गावात कचरा साठविण्यासाठी किंवा एकत्र करण्याची सोय नसते. घरातील कचरा रस्त्याच्या कडेला टाकला जातो. स्वयंपाक घरातील नासलेले पदार्थ , अन्नकण मिश्रित पाणी, त्याज्य वस्तू यांचे ढिग पसरलेले असतात त्यामधून डास, माश्या यांचे प्रमाण वाढत जाते. घरे स्वच्छ
झाडतात, परंतू घरातील केरकचरा कोठेही फेकुन दिला जातो. घर, अंगण स्वच्छ दिसते परंतु सभोवतालचा परिसर, रस्ते मात्र अस्वच्छ दिसतात. केरकचरा रस्त्यावर टाकल्यामुळे सामाजिक आरोग्य बिघडते. लोक रस्त्याच्या कडेला लघुशंका करतात, रस्त्यांवर थुंकतात, प्रातःविधी करतात यामुळे सर्व परिसर आजारास प्रतिकूल बनतो. ग्रामस्वच्छता अथियानाच्या माध्यमातून कचरा निर्मलनाचे योग्य व्यवस्थापन केले जाते.

**5) घर व घर परिसर :**

घरातील केरकचरा, झाडलेली धुळ, माती, खराब भाजीपाला, टाकऊ पदार्थ, अन्न पदार्थ यांचा समावेश घर व घर परिसर स्वच्छतेत होतो. याची विल्हेवाट न लावल्यास माशा, झुरळे, घुशी, उंदिर यांचा प्रादुर्भाव होऊन वेगवेगळे आजार उद्‌भावण्याचा धोका निर्माण होतो. केचरकचरा एका टोपलीत दररोज एकत्र करुन नियमितपणे कचरा कुंडी उपलब्ध असेल तर कचरा कुंडीत टाकावा किंवा कचरा कुंडी उपलब्ध नसेल तर खत खड्यात टाकणे आवश्यक आहे. ग्रामीण परिसरात स्वयंपाक घर व न्हाणी घरातील सांडपाण्याची व्यवस्था नसते. घराच्या भोवती केरकचरा, खरकटे, भाजीपाला टाकल्याने, लहान मुलास शौचास बसविल्याने, जनावरांचे गोठे, कोंबड्याचे खुराडे असल्यास धनुर्वातासारख्या रोगांचे जंतू वाढीस लागतात.

**6) गाव परिसर :**

गावातील केर कचरा, जनावरांचे शेण, दुकान, हॉटेल मधील घाण रस्त्यावर पडलेल असते. त्यामुळे सर्वदुर दुर्गंधी पसरुन सर्व परिसर दुर्गंधीयुक्त होतो. त्यामुळे आपलेच आरोग्य धोक्यात येऊ शकते. तसेच टाकाऊ पदार्थ व सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावली जात नाही. त्यामुळे गावाचे आरोग्य धोक्यात येते. तसेच टाळण्यासाठी अभियानातून ग्रामपंचायती पर्यावरण संरक्षण मोहीम राबविणे, कचरा कुंड्यांची हातगाड्यांची व्यवस्था करणे इ. प्रयत्न करतात. सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास आरोग्य धोक्यात येवू शकत नाही. याचो अभियानामुळे समाजात जाणीव निर्माण झालेली आहे.

**7) शालेय स्वच्छता :**

स्वतःचे शरीर, परिसर, शाळा व गाव घाणीपासून मुक्त असणे आवश्यक आहे. उद्याचा नागरिक असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून स्वच्छता सवयी लावणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमार्फत प्रत्येक घरापर्यंत स्वच्छतेचा संदेश सहज पोहचवता येतो. शालेय स्वच्छतेत दररोज स्वच्छ कपडे घालणे, डोके, कान, नाक साफ करणे नखे काढणे, उघड्यावर शौचास न जाणे

Half Yearly - Nov. 2018-Apr. 2019
Issue X Vol III , Feb. 2019
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

असे संस्कार अगदी सहज रुजविता येतात. अभियानांतर्गत घराची मांडणी, सजावट व सौंदर्यीकरण या बाबी अभियानात महत्त्वाच्या मानल्या जातात. घरांची अंतर्गत व बाह्य मांडणी या दोन बाबींना महत्त्वाचे स्थान असावे. महिला मंडळे घरोघरी जाऊन एकमेकांचे प्रबोधन करु शकतात. घरातील सामानाची रखरखाव, पिण्याचे पाणी त्यासाठी ओगराळयाचा वापर करणे, अन्न झाकुन ठेवणे, भांडी दररोज पहाटे साफ करणे, या बाबींची जाणीवपुर्वक पालन करणे आवश्यक आहे. घराच्या बाहेरील मांडणीत घराचे अंगण दररोज पहाटे साफ करणे, परस बागा तयार करणे याचा समावेश होतो.

**निष्कर्ष व सूचना :**

अरोग्यदृष्ट्या अभियानात शौचालय व त्याच्या वापराला अधिक महत्त्व देण्यात येते. अभियानाची सर्व गावांनी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. शौचालय वापराबाबत अनेक उलट सुलट चर्चा सुरु असतात. शौचालय व त्याच्या वापराबाबत जाणीव जागृतिचा अभाव आहे. हे काम ग्रामीण भागात अनेक लोक उघड्यावर शौचास जातात. परंपरेनुसार प्रत्येक गावाला वेगळ्या शौचासाठी मोकळया सोडलेल्या होत्या. स्त्री पुरुष वेगवेगळ्या दिशांना शौचास जात असत. परंतु अलिकडे झपाट्याने लोकसंख्या वाढत असल्यामुळे पुर्वीची गावठाणे कमी पडत आहेत. गावाजवळची शेती शौचासाठी वापरली जायची ती देखील आता वस्तीखाली आल्यामुळे शौचविधीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

प्रत्येक गावातील सर्व महिला-पुरुष, युवक-युवती आणि सर्व मानवी ताकद गावाचा विकास साधण्यासाठी जेव्हा एकजीव होतील तेंव्हाच गावाचा सर्वांगिण विकास साध्य होईल. ग्रामस्वराज्याची संकल्पना मूर्त स्वरुपात आणण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची भूमिका महत्त्वपुर्ण ठरत आहे, हे मान्य करावेच लागेल. स्वच्छता साक्षर मोहिम अधिक कार्यक्षम करणे गरजेचे आहे. लहान वयातच मुलांच्या मनावर स्वच्छतेचे संस्कार होणे आवश्यक आहेत. गावात घंटा गाड्या, गटार स्वच्छतेसाठी मशीन खरेदी करणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत मधील शिपाई कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करुन त्यांना योग्य ते मानधन देण्यात यावे.

**संदर्भ :**

1.UNICEF- लोकाधारित घण कचरा व सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रमासाठी सहभागी नियोजन पुस्तिका.
2.महाराष्ट्र शासन - जागतिक बँक प्रकल्प जीवनधारा 1998, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
3.महाराष्ट्र शासन - कायमस्वरुपी स्वच्छता माहिती पुस्तिका 2005, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई.
4.ग्राम विकासाची दिशा आणि पंचायतराज प्रशासन, राज्यकृत्ती आराखडा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.
5.शासन निर्णय क्र. अभियान - 2003/प्र.क्र.278/पापु-16 पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय,
6.मुंबई दि. 24 सप्टेंबर 2003.
7.वाघोला अनिल एस. - स्वच्छता का समाज शास्त्र 2015, कल्पाज पब्लिकेशन, दिल्ली.
8.अग्रवाल प्रमोदकुमार - भारत में पंचायती राज, 2008 ज्ञानगंगा, नई दिल्ली.
9.www.mdws.gov.in

Copyright © Shaurya Publication, Latur | www.rjorunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com 